# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४

## ।। प्रकटन ।।

विषय :- फेब्रुवारी- मार्च २०१८ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षांसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणी प्रमाणपत्रांबाबत.....

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा फेबुवारी- मार्च २०१८ परीक्षांसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची नाव नोंदणी प्रमाणपत्रांसाठी (Enrolment Certificate) ऑनलाईन अर्ज विभागीय मंडळाकडे सादर करण्याबाबत विदयार्थ्यांना कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने फॉर्म नं १७ प्राप्त अर्जांची छाननी करून जे विद्यार्थी नाव नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांची नाव नोंदणी प्रमाणपत्रे (Enrolment Certificate) दिनांक २१/११/२०१७ पासून उपलब्ध करून देण्याबाबत त्यांच्या भ्रमणध्वनीवर व ईमेलवर संदेश (SMS) प्राप्त होतील. अशा विद्यार्थ्यांनी आपले स्वत:चे नावनोंदणी प्रमाणपत्र इ.१० वी साठी http://form17.mh-ssc.ac.in व इ.१२ वी च्या विदयार्थासाठी http://form17.mh-hsc.ac.in या संकेत स्थळावरून दि.२३/११/२०१७ पासून ऑनलाईन उपलब्ध करून घ्यावीत.

इयत्ता १० वी विद्यार्थ्यांसाठी योग्य मार्गदर्शन व येणाऱ्या अडचणींचा निपटारा करण्यासाठी विभागीय मंडळामार्फत संपर्क केंद्रे निश्चित करण्यात आली असून सदर विद्यार्थ्यांना संपर्क केंद्रामार्फत स्वाध्याय पुस्तिका देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी सदर स्वाध्याय पुस्तिका विशिष्ट कालावधीत वेळापत्रकाप्रमाणे सोडवून संपर्क केंद्राकडे जमा करावयाच्या आहेत. तेव्हा इयत्ता १० वी च्या संबंधित विद्यार्थ्यांनी संपर्क केंद्रप्रमुखांशी संपर्क साधावा. व तसेच इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांनी आपल्या संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

फेब्रुवारी-मार्च २०१८ च्या परीक्षांसाठी खाजगीरित्या परीक्षेस प्रविष्ट होणा-या विद्यार्थ्यांसाठी डिसेंबर २०१७ या महिन्यात आवेदनपत्रे ऑनलाईन भरण्याच्या तारखा स्वतंत्रपणे कळविण्यात येतील.

प्रति ,
प्राचार्य/मुख्याध्यापक

सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा संपर्क केंद्र/क.महाविद्यालयाचे पुणे/अ.नगर/सोलापूर जिल्हा.

उपरोक्त प्रकटन हे पुणे विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेत येणा-या सर्व माध्यमिक शाळा/खाजगी विद्यार्थी संपर्क केंद्र (इ.१०वी)/क.महाविद्यालयातील फॉर्म नं.१७ भरलेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ
पुणे-४११००५.